# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.09.2025** **वारःमंगळवार**

---

1. शांघाय सहकार्य देशांना सर्व प्रकारच्या दहशतवादाच्या विरोधात निर्णायक कारवाई करण्याचं पंतप्रधानांचं आवाहन
2. नवी दिल्लीतील यशोभूमी इथं सेमिकॉन इंडियाचं आज उद्घाटन
3. यूपीआयद्वारे ऑगस्ट महिन्यात २० अब्ज व्यवहारांचा टप्पा ओलांडून नवा विक्रम.
4. भूकंपग्रस्त अफगाणिस्तानला भारताद्वारे मानवतावादी मदतीचा हात, मृतांची संख्या ८०० च्यावर आणि
5. विश्व बॅडमिंटन स्पर्धा पुढील वर्षी ऑगस्टमध्ये भारतात होणार

**<u>पंप्र</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शांघाय सहकार्य संघटनेच्या सदस्य देशांना सर्व स्वरूपातील दहशतवादाविरुद्ध निर्णायक कारवाई करण्याचं आवाहन केलं. चीनमधील तियानजिन इथं झालेल्या एससीओ शिखर परिषदेला संबोधित करताना, मोदी यांनी दहशतवादाबाबत दुटप्पीपणा बाळगू नये आणि सीमापार दहशतवाद घडवून आणणाऱ्या आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या देशांना जबाबदार धरण्याचं देखील आवाहन केलं. भारत सुरक्षितता, संपर्काचं जाळं आणि संधी या बाबतीत अधिक काम करू इच्छितो असं सांगून पंतप्रधानांनी सांगितलं की भारताने चाबहार बंदर आणि आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक मार्गासारख्या प्रकल्पांना जोरदार पाठिंबा दिला असं नमूद केलं.

एससीओ शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशीही विचारांची देवाणघेवाण केली. परिषदेच्या समाप्तीनंतर स्वीकारण्यात आलेल्या तियानजिन घोषणापत्रात, सदस्य राष्ट्रांनी यावर्षी २२ एप्रिलच्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा स्पष्टपणे निषेध केला आणि जबाबदार असलेल्यांवर कारवाईची मागणी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर विविध क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्यावर चर्चा केली आणि द्विपक्षीय संबंधांमधील सातत्यपूर्ण वाढीबद्दल समाधान व्यक्त केलं. मोदी यांनी युक्रेन संघर्ष लवकरात लवकर संपवण्यावर भर दिला.

सिंगापूरपंतप्रधानदौरा

सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आज येणार आहेत. वोंग, पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत द्विपक्षीय चर्चा करतील आणि भारतीय उद्योग आणि व्यवसाय प्रमुखांशी संवाद साधतील. वोंग यांच्या दौऱ्यादरम्यान कौशल्य विकास, वित्त आणि डिजिटल, नागरी विमान वाहतूक, अंतराळ सहकार्य आणि जहाजबांधणी या क्षेत्रांसह अनेक करारांवर स्वाक्षरी होणार आहे.

**<u>सेमीकॉन</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीतील यशोभूमी इथं सेमिकॉन इंडिया - २०२५ चं उद्घाटन करतील. तीन दिवसांच्या या परिषदेत देशातील एक भक्कम, लवचिक आणि शाश्वत सेमीकंडक्टर परिसंस्था विकसित करण्यावर भर दिला जाईल. पंतप्रधान उद्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या गोलमेज परिषदेत भाग घेतील. ४८ हून अधिक देशांमधील अडीचहजारपेक्षा जास्त प्रतिनिधी या परिषदेत सहभागी होतील. या कार्यक्रमात डिझाइन लिंक्ड इन्सेंटिव्ह योजनेअंतर्गत उपक्रम, स्टार्टअप परिसंस्थेची वाढ, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि भारताच्या सेमीकंडक्टर क्षेत्रासाठी भविष्यातील आराखड्यावर सादरीकरण होणार आहे.

**<u>डिजीटल</u>**

यूपीआय म्हणजे युनिफाइड पेमेंट्स इंटरफेसनं यावर्षी ऑगस्ट महिन्यात पहिल्यांदाच वीस अब्ज व्यवहारांचा टप्पा ओलांडून एक नवीन टप्पा गाठला आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियानं दिलेल्या माहितीनुसार गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये अंदाजे पंधरा अब्ज व्यवहार झाले होते. यूपीआयने या वर्षी ऑगस्टमध्ये २४ कोटी ८५ लाख रुपयांचे व्यवहार नोंदवले.

दरम्यान, वस्तू आणि सेवा कर संकलनात गेल्या वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत या वर्षी ऑगस्टमध्ये साडेसहा टक्क्यांनी वाढ होऊन ते एक लाख ८६ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त झालं आहे. अर्थ मंत्रालयाच्या मते, निव्वळ जीएसटी संकलनातही १० पूर्णांक ७ टक्क्यांनी वाढ होऊन ते एक लाख ६६ हजार कोटी रुपये झालं आहे.

**<u>DGCA</u>**

नागरी विमान वाहतूक महासंचालनालय अर्थात DGCA ने  पहिल्यांदाच एअर इंडिया SATS एअरपोर्ट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडला सुरक्षा मंजुरी दिली आहे. यासह, भारत, आशिया प्रशांत प्रदेशात ICAO मार्गदर्शनानुसार अशा व्यापक रचनेची अंमलबजावणी करणारा मलेशियानंतर दुसरा देश बनला आहे. हे पाऊल संपूर्ण भारतातील ग्राउंड हँडलिंग ऑपरेशन्समध्ये सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली मजबूत करण्याच्या वचनबद्धतेला दृढता प्रदान करते असं DGCA ने म्हंटलं आहे.

**<u>मदत</u>**

अफगाणिस्तानच्या कुनार प्रांतात झालेल्या विनाशकारी भूकंपानंतर भारतानं त्या देशाला मानवतावादी मदत पाठवली आहे. या भूकंपात किमान ८१२ लोकांचा मृत्यू झाला आणि दोन हजार ८०० हून अधिक

लोक जखमी झाले. परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री मवलवी अमीर खान मुत्ताकी यांच्याशी चर्चा केली आणि अफगाणिस्तानात झालेल्या जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला. भारतीय मिशननं काबूलहून कुनारला १५ टन मानवतावादी मदत पाठवली आहे. उद्यापासून भारताकडून आणखी मदत साहित्य पाठवलं जाईल असं आश्वासन मंत्र्यांनी दिले. तत्पूर्वी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अफगाणिस्तानमध्ये झालेल्या भूकंपात झालेल्या जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त करताना सर्वतोपरी मानवतावादी मदत देण्यासाठी भारत तयार असल्याचं सांगितलं. अफगाणिस्तान सरकारच्या प्रवक्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पूर्वेकडील कुनार प्रांताला या भूकंपाचा सर्वाधिक फटका बसला आहे.

**<u>शहा</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल जम्मूमधील पूरग्रस्त भागांना भेट दिली आणि तावी पुलावर पुरामुळं झालेल्या नुकसानाची पाहणी केली. पुरामुळं सर्वाधिक नुकसान झालेल्या चक मांगू या गावालाही त्यांनी भेट दिली. आपत्ती प्रतिसाद दलांकडून मदत आणि बचाव कार्य पूर्ण वेगानं सुरू आहे, तसंच बाधित लोकांना वैद्यकीय मदत पुरवली जात आहे असं शहा यांनी एका संदेशात सांगितलं. गेल्या महिन्याच्या १४ तारखेपासून जम्मूमध्ये ढगफुटी, भूस्खलन आणि अचानक आलेल्या पुरात १३० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे.

पंजाबमध्ये १ ऑगस्टपासून सुरू असलेल्या पुरात २९ जणांचा मृत्यू झाला आहे, तर तीन जण बेपत्ता आहेत. १२ पूरग्रस्त जिल्ह्यांमध्ये मृत्यूंची नोंद झाली आहे, यापैकी पठाणकोटमध्ये सर्वाधिक सहा जणांचा मृत्यू झाला आहे आणि काही जण बेपत्ता आहेत. परिस्थिती गंभीर असल्यानं अधिकाऱ्यांनी मदत आणि बचाव कार्य सुरू ठेवलं आहे.

**<u>जलशक्ती</u>**

ग्रामीण स्वच्छ भारत अभियान आणि जल जीवन अभियान, देशाला शाश्वत स्वच्छता आणि जल सुरक्षेकडे घेऊन जात आहेत, असं केंद्रीय जलशक्ती मंत्री सीआर पाटील यांनी म्हंटलं आहे. ते काल नवी दिल्लीत, ‘स्वच्छ भारत अभियान – ग्रामीण’ या विषयावरील गोलमेज परिषदेत बोलत होते. पाटील यांनी सामूहिक कामगिरीचे कौतुक करत आणि नवोपक्रम, कचऱ्यापासून ऊर्जा आणि हवामान-प्रतिरोधक स्वच्छता करण्यावर भर दिला. जल जीवन अभियांनाअंतर्गत देशाच्या ग्रामीण भागातील प्रत्येक घराला सुरक्षित नळाचे पाणी मिळत आहे असं सांगत, उघड्यावर शौचमुक्त अभियान ग्रामीण कुटुंबांसाठी जीवनमान, आरोग्य आणि प्रतिष्ठा बहाल करते असं त्यांनी नमूद केलं.

**<u>युद्धअभ्यास</u>**

भारत-अमेरिकेदरम्यान एकविसाव्या संयुक्त लष्करी सराव युद्ध अभ्यासात सहभागी होण्यासाठी भारतीय लष्कराची एक तुकडी अमेरिकेतील अलास्कामधील फोर्ट वेनराईट इथं पोहोचली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी समाज माध्यमावर ही माहिती दिली. भारत-अमेरिका संयुक्त लष्करी सरावाची एकविसावी आवृत्ती या महिन्याच्या १४ तारखेपर्यंत सुरू राहील. भारतीय तुकडीत मद्रास रेजिमेंटच्या एका बटालियनचे कर्मचारी असून ते अमेरिकेच्या ११ व्या एअरबोर्न डिव्हिजनचा भाग

असलेल्या आर्क्टिक वुल्व्हज ब्रिगेड कॉम्बॅट टीमच्या "बॉबकॅट्स" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाचव्या इनफंट्री रेजिमेंटमधील अमेरिकन सैनिकांसोबत प्रशिक्षण घेतील.

**प्रधान**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शिक्षण व्यवस्थेत डिजिटलायझेशनचे एकत्रीकरण आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा परिचय करून देण्याच्या गरजेवर भर दिला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या ६५ व्या स्थापना दिनानिमित्त नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी, प्रधान यांनी देशभरात शिक्षणाची गुणवत्ता आणि अभ्यासक्रम विकास वाढवण्यासाठी पीएम ईविद्या मोबाईल ॲप्लिकेशन, दीक्षा द्वितीय याचा आरंभ केला. भारतातील शिक्षण क्षेत्राच्या प्रगतीमध्ये एनसीईआरटीच्या भूमिकेचंही प्रधान यांनी कौतुक केलं.

**अमेरिकनखुलीटेनिसस्पर्धा**

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत, महिला एकेरीत, जपानच्या नाओमी  ओसाकाने, अमेरिकेच्या कोको गौफ हिचा 6-3, 6-2 असा पराभव करत स्पर्धेची उपांत्यपूर्व  फेरी गाठली आहे. पुरुष एकेरीमध्ये कॅनडाच्या फेलीक्स ऑगर-अलियासिमने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्यपूर्व फेरीचा दूसरा सामना नोवाक योकोविच आणि टेलर फ्रिट्ज यांच्यात होणार आहे.

**बॅडमिंटन**

बॅडमिंटन विश्व अजिंक्यपद स्पर्धांचं पुढील वर्षी ऑगस्टमध्ये भारतात नवी दिल्ली इथं आयोजन केलं जाणार आहे. पॅरिसमध्ये २०२५ च्या स्पर्धेच्या समारोप समारंभात काल बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशननं ही घोषणा केली. म्हणजे १७ वर्षांनंतर ही स्पर्धा भारतात पुन्हा भरवली जाणार आहे. हैदराबाद इथं २००९ मध्ये या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचं आयोजन केलं होतं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.